# प रि शि ष्ट - ६

## मुलाखतीत विचारलेले प्रश्न -

## पारंपारीक प्रशिक्षण गट व प्रायोगिक क्षमता गट

### पूर्व चाचणी

प्रश्न १ कोणतीही कल्पना नसताना पूर्व चाचणी देतेवेळी पाठ टाचण लिहिले होते काय ?

प्रश्न २ पहिला पाठ घेण्यापूर्वी पाठयांश वाचला होता काय ?

प्रश्न ३ पहिला पाठ घेत असताना तुम्हास काय वाटले ?

प्रश्न ४ पूर्व चाचणीचे वेळी विद्यार्थ्यांकडे पाहून पाठयांश विसरला काय ?

प्रश्न ५ अध्यापनाचे वेळी आत्मविश्वास किती प्रमाणात होता ?

प्रश्न ६ फलक लेखन करतांना तुम्हास काय वाटले ?

प्रश्न ७ अध्यापन करताना तुम्हास कोणते अनुभव आले ?

## पारंपारीक प्रशिक्षण गट

## [पारंपारीक प्रशिक्षण]

### नियोजन

प्रश्न १ नियोजनासाठी नमुना पाठ टाचण दिल्यानंतर ते वाचून कितपत समजले ?

प्रश्न २ नियोजन कृती सत्रात पाठ टाचण तयार करताना कोणत्या अडचणी आल्या ? त्या योग्यवेळी प्राध्यापकांना विचारल्या का ?

प्रश्न ३ शिक्षक कृती-विद्यार्थी कृती या बाबत शंका निर्माण झाल्या का ?

प्रश्न ४ दिलेल्या नमुना पाठ टाचण पध्दतीप्रमाणे पाठ टाचण काढता येईल का ?

प्रश्न ५ दिलेल्या नमुना टाचणातील पध्दती प्रमाणे सर्व पायऱ्या लिहून पाठ टाचण काढता येईल काय ?

प्रश्न ६ उत्तर चाचणी १ चे वेळी पाठ घेताना किती प्रमाणात आत्मविश्वास वाटला ?

# पारंपारीक प्रशिक्षण गट

## [पारंपारीक प्रशिक्षण]

### सराव

प्रश्न १ सरावासाठी पाठ घेताना काय वाटले ?

प्रश्न २ छात्राध्यापकांना सराव पाठ घेणे उपयुक्त आहे असे वाटले का ?
त्यामुळे आत्मविश्वास वाढला काय ?

प्रश्न ३ सराव झाल्यानंतर तिसऱ्या चाचणीचे वेळी छात्राध्यापकांना पाठ
चांगला घेता येतो असे वाटले का ? किती प्रमाणात ?

प्रश्न ४ छात्राध्यापकांनी पाठ घेताना सर्व पायऱ्या घेतल्या काय ?

प्रश्न ५ फलक लेखन करताना काय वाटले ?

## प्रायोगिक क्षमता प्रशिक्षण गट

## पाठ टाचण कार्यवाही

प्रश्न १ तुम्हास कार्यवाहीसाठी तयार पाठ टाचण दिल्यावर ते वाचून काय वाटले ?

प्रश्न २ तुम्हास प्रारंभ वाचल्यानंतर काय वाटले ?

प्रश्न ३ पाठ टाचणातील पाठयांश वाचल्यावर क्रमिक पुस्तकातील पाठयांश वाचण्याची गरज भासली का ?

प्रश्न ४ शिक्षक कृती मधील प्रश्न विचारणे, स्पष्टीकरण करणे, दिग्दर्शन करणे या बद्दल तुम्हास काय वाटले ?

प्रश्न ५ समारोप संकलन, उपयोजन व गृहपाठ हे उपयुक्त आहेत असे वाटते का ?

प्रश्न ६ तीन वेळा सराव घेतल्यानंतर आणखी सरावाची आवश्यकता वाटली का ?

प्रश्न ७ पाठ टाचण नमुने वाचून पाठ घेण्यास कांहीतत्वे आहेत असे वाटले का ?

## प्रायोगिक क्षमता प्रशिक्षण गट

### नियोजन

प्रश्न १ पाठ नियोजन संदर्भ साहित्य पुस्तिका वाचल्यानंतर तुम्हास काय वाटले ?

प्रश्न २ कार्यवाहीमुळे व तयार पाठ टाचण वाचल्यामुळे तुम्हास किती प्रमाणात उपयोग झाला ? त्यामुळे पाठ टाचण काढणे सोपे वाटले का ?

प्रश्न ३ पाठ नियोजनामुळे घटकाची उद्दिष्टे साध्य होतात काय ?

प्रश्न ४ पाठ नियोजन संदर्भ साहित्य पुस्तिकेमुळे तुम्हास स्वत: पाठ नियोजन करण्यात कितपत यश आले ?

प्रश्न ५ पाठ नियोजनाच्या तिसऱ्या सरावानंतर पाठ घेणे सोपे आहे असे वाटते काय ?

प्रश्न ६ पाठ नियोजन कृति सत्राच्या तिसऱ्या सरावाचे वेळी आत्मविश्वास किती प्रमाणात आला ?

प्रश्न ७ कार्यवाहीनंतर नियोजनामुळे कोणता अनुभव आला ?